JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मराठी कवितेतील आई आणि माय

**डॉ. संजय जनार्दन आगलावे**

**सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)**

**जे. डी. पाटील महाविद्यालय दर्यापूर**

**भ्रमरध्वनी– 9850302278**

**ई–मेल– aglawesanjaysir@gmail.com**

जीवनामध्ये आईचे महत्व अनन्यसाधारण आहे, किंबहुना सजीवाच्या अस्तित्वच आई मय आहे, म्हणूनच आई शिवाय आपल्या अस्तित्वाला फारसे महत्व नाही. म्हणून कवी यशवंत म्हणतात स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असा आईचा महिमा आहे, मराठी साहित्याचा विचार करता आईबद्दल बरेच लिहिल्या गेले आहे, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, कविता यामधून आईचे चित्रण आले आहे. आई म्हणा माय म्हणा मातृभाव सारखाच आढळतो, मराठी कवितेमधील आई किंवा माय या विषयावर जुन्या आणि नव्या अशा अनेक कविता आहे. तिथे असणार नाही माझी आई हे अंगाई गीत वा.घो. मायदेव यांनी, तर निज निज माझ्या बाळा हे अंगाई गीत गाजलेले आहे, तर अलीकडील माझी आई ही नारायण सुर्वे यांची कविता, माय ही वामन निंबाळकर यांची कविता, माय ही स.ग. पाचपोर यांची कविता ग्रेस यांची आई कविता फ. मु. शिंदे यांची आई कविता, लक्ष्मण महाडिक यांची आई कविता, बाळां नीज गडे हे दारिद्र्याने गांजलेल्या आईचे आपल्या बाळाला वास्तवतेचे दर्शन घडविले आहे. दारिद्र्यामुळे झोपडीत राहायला असलेल्या, कुसुमाग्रजांनी संपादित केलेल्या निवडक कविता पैकी असलेली निज निज माझ्या बाळा ही कवी दत्त ही कविता अतिशय गाजलेली आहे. तरुण वयात त्यांचे निधन झाले अशी नैराश्याचे दर्शन घडविणारी कविता तरुणाने का लिहावी असा प्रश्न पडलेला आहे. या अंगाई गीतामध्ये नैराश्य आणि दुःख याचे सावट आहे. बाळाला निजवत असताना परिस्थितीचे वर्णन आले आहे .

रवी गेला रे सोडून

आकाशाला

धन जैसे दुर्भाग्याला

अंधार वसे चोहीकडे गगनात

दारिद्र्याचा अंधार सर्वत्र पसरलेला आहे, रात्रीच्या वेळी सर्व इहलोक थकून निजलेला आहे, घरात उंदीर अन्नाच्या शोधात फिरत आहे, पण घरात अन्नाचा कणही नसल्यामुळे ते शेवटी निराश होतात. लवकरच तेही घर सोडून जातील ज्याप्रमाणे दारिद्र्यामुळे नातेवाईक सुद्धा आपल्याला सोडून गेले, त्यांचे घर कुडाचे आहे त्याच्या भिंती कुजून त्याला छिद्रे

पडलेली आहे, त्यामधून आपल्या दारिद्र्याचे दर्शन जगाला घडत आहे जीर्ण मोडळे दार करकरत आहे, जणू दुःखाने कव्हणे आहे, आपले दारिद्र्य लोकांना त्यामुळे कळत आहे, फटीतून वाहणारा वारा डोळ्यातील अश्रूधारा सुकवणारा आहे, निज निज तुला म्हणताना हा जणूसूर देतो आहे, उपरोधी शैलीतून कवीने ही वास्तव सांगितलेले आहे. आपल्या बाळाला परिस्थिती जाणीव करून देताना ती म्हणते जोपर्यंत हे झोपडे शाबूत आहे तोपर्यंत तू छान झोप, ते पडल्यावर सुद्धा काळजी करू नको, कारण दारिद्र्याला कोणी चोरू शकत नाही. आपल्या मुलाच्या वाट्याला असले दिवस यावे असे कोणत्याही आईला वाटत नाही. पण वास्तवतेमुळे ती निराश झालेली आहे. जोपर्यंत आपल्या शरीरात प्राण आहे तोवर तुझे संगोपन मी करीन त्यानंतर सुद्धा चिंता करण्याची गरज नाही, कारण परमेश्वरच त्राता आहे. दारिद्र्य कोणी चोरत नाही, आपल्या अपरोक्ष आपल्या लेकराची अवहेलना होऊ नये ही चिंता मातेला सतावत आहे. पण परिस्थिती कितीही वाईट असली तरी संस्काराचे देणे आपल्या मुलाला देणारी ती आई आहे, ती म्हणते –

तरी सोडू नको सत्याला

धन अक्षय तेच जीवाला

सत्यरुपी अक्षय धन या धनाला तू जपले पाहिजे, ही दारिद्र्यातही विचारांची श्रीमंती आहे, त्यामुळे ही कविता वाचत असताना नकळत डोळे पाणावतात, आणि केवळ आर्थिक श्रीमंती म्हणजे सर्व नाही हे समजल्यावर डोळे उघडतात दुहेरी परिणाम साधणारी ही कविता आहे.

आई ही फ. मु. शिंदे यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. आईची असणे आणि नसणे यातील फरक या कवितेतून अधोरेखित केलेला आहे. आई असल्यामुळे घराला कसे घर पण येते हे याचे वर्णन केलेले आहे.

आई एक नाव असतं

घरातल्या घरात

गजबजलेले गाव असतं !

सर्वात असते तेव्हा जाणवत नाही

आता नसली कुठंच

तरीही नाही म्हणवत नाही !

आईच्या अवतीभवती सारे विश्व सामावलेले, असते तिच्या अस्तित्वाच्या खुणा घरभर असतात, जेव्हा ती असते तेव्हा जाणवत नाही आणि नसली तरी नाही म्हणवत नाही, मुले मोठी झाली की आपापल्या मार्गाने निघून जातात, याचे वर्णन करताना कवी म्हणतो –

जत्रा पांगते पाल उठतात

पोरक्या जमिनीत उमाळे दाटतात

आई प्रत्येकाच्या मनात घर करून असते, जीवाचं जीवालाच कळावं असं काहीतरी आई देऊन जाते.

आई सर्व घराला जोडून ठेवणारा धागा असते, स्वतःला जाळून कष्ट उपसून घराला घरपण देणारी आई असते.

ज्यावेळी प्रकाश असतो त्यावेळी तिचे अस्तित्व जाणवत नाही, पण ज्यावेळी ती नसते तेव्हा सैरावैरा धावायला रानही कमी पडते, पिकं येतात जातात माती व्याकूळ असते त्याप्रमाणे आईचे ममत्व कधीही संपत नाही, तिची तहान कधीच संपत नाही, आईची माया ती नसली तरी ज्यावेळी खोल खोल जाण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा तिच्या अंतकरणाची खाण सापडते, याहून का निराळी असते, आई काय असते ? हे सांगताना कवी म्हणतो लेकराची माय, वासराची गाय, दुधाची साय असते, लेकरू कमकुवत असेल अशक्त असेल तर त्याचा पाय सुद्धा ती होते. आई जन्मभर पुरणाऱ्या शिदोरी प्रमाणे असते, आई हे असे नाव आहे, ज्यावेळी ती नसते तिचे अस्तित्व कसे जाणवते, दुःखाची जाणीव तीव्र करणारे असते हे सांगताना कवी म्हणतो—

आई एक नाव असतं

नसते तेव्हा

घरातल्या घरात

गल्बललेलं गाव असतं

गीतरामायणाने जे अजरामर झाले, ज्यांनी अनेक कविता, गीते लिहून मराठी भाषेचे ण फेडले असे गदिमा म्हणजेच ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास तर काहीही देणाऱ्या माणसापेक्षा समाजाला गाणे देणाऱ्या माणसाचे उपकार फार मोठे असतात, अशा शब्दात पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या गौरव केला मातृवंदना ही त्यांची कविता मातृविषयक प्रेमभाव तिच्याविषयीचा ड्डतज्ञता भाव या कवितेतून व्यक्त झाला आहे.

दिला जन्म तू विश्व दावीलेस

किती कष्ट माये सुखे साहिलेस

आई मुळे या विश्वाचे दर्शन होत आहे, आईने घेतलेल्या कष्टाची जाणीव त्यांना आहे, आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या आईच्या पावलांना ते वंदन करतात, माझ्या जीवनातील आद्यगुरु तु आहेस, तूच माझ्या मनात धर्मबीज पेरली, तसेच प्रपंचाचा चांगला मार्ग दाखविलास, अशा मातेच्या पावलांना मी वंदन करतो, तुझे थोर संस्कार आचार झाले, तुझे यत्नप्रामाण्य सिद्धीस केले, उमीचे रमेचे तसे शारदेचे जप ज्ञान महत्त्वाचे आहे, तसेच तुझे महत्त्व आहे, तुझ्याच प्रेरणेने जीवन प्रवास यशस्वी ठरलेला आहे, आई सारखे दैवत ही ग. दि. माडगूळकर यांची प्रसिद्ध कविता आहे, आईचा महिमा कवीने या कवितेतून सांगितलेला आहे, म्हणूनच ते म्हणतात आईसारखे दुसरे दैवत साऱ्या जगतावर नाही. त्यामुळे श्रीकाराच्या नंतर अ आ इ शिकावी लागते तीच आपल्या सांभाळा करीत असते तीच आपली सेवा त्रीकाळी करीत असते, म्हणून देवानंतर आईच्याच पायाशी मस्तक नमवत असतात आई आपल्याला कशी घडवत असते हे सांगताना कवी म्हणतो –

कौसल्येविण रामा न झाला

देवकी पोटी ड्डष्ण जन्मला

शिवरायाचे चरित्र घडवी माय

जिजाबाई

म्हणून आईचे ण कधीही विसरू नये, आईच्या पुण्याईचे स्वरूप लक्षात घेऊन आपण चांगले कार्य करून उतराई होण्याचा प्रयत्न करावा.

नारायण सुर्वे यांची माझी आई ही कविता, कवींची आई ही सामान्य गिरणी कामगार आहे, गिरणीचा भोंगा वाजायला सुरुवात होते तेव्हा दिंडी सारखा जत्था या लगबगिने कामावर जायला निघतो, तेव्हा माझी आई झपाझप पावले उचलीत पुढे निघते, घरी तिचे लहान मुले आहेत, त्यांना ती समजावून सांगते, मी येईपर्यंत कुणाशी भांडू नका, म्हणून दोन पैसे ती देऊन जाई.

दसऱ्याचा आदला दिवस कवीच्या दृष्टीने खूप आनंदाचा असायचा, पाचही भावंडांना घेऊन ती गिरणीत जाई, त्यावेळी दसऱ्याच्या निमित्ताने मांडलेली आरास बघत, साऱ्या खात्यातून कवी हुंदडत असे, तो आनंद अवर्णनीय होता, ते कवीला शब्दांमध्ये मांडता येत नाही, भिंगऱ्या, पेपटे तसेच फुगे पतंगा समान आकाशात उडवीत पक्षाप्रमाणे आनंदात विरहत असत, आई सोबत घालवलेले आनंदाची क्षण त्यांच्या स्मरणात आहे, पण एक दिवस अचानक त्यांच्यावर दुःखाचे पहाड कोसळते, त्यांची आई त्यांना सोडून जाते याचे हृदयद्रावक वर्णन या कवितेत आलेले आहे.

एक दिवस काय झाले तिला गाडीतून आणले

होते तिचे उघडे डोळे तोंडातून रक्त भळभळे

जोडीवालीण तीची साळू जवळ घेतो म्हणाली बाळू

मिटीमिटी पहात होते माझे छत्र शोधीत होतो

आम्ही आई शोधीत होतो

हा दिवस कवीसाठी त्याला पोरकेपणाची जाणीव करून देणार होता, त्या रात्री त्याच्या पाचही भावंडांनी एकमेकांस बिलगून चादर ओढून जणू आईची माया समजून घेतली, आधीच त्यांना कोणी आप्त नव्हते, एकमेव आईचा साधार होता, आता ती देखील राहिली नव्हती, अश्रू कसेबसे रोखून एखाद्या वेड्या कलंदराप्रमाणे त्यांनी रात्र जागून काढली होती.

माय ही स. ग. पाचपोळ यांची कविता ही कविता अलीकडच्या काळातील प्रसिद्ध कविता माय ची महती व तिच्या हाल अपेष्ठा अधोरेखित केल्या आहेत.

हंबरुनी वासराले चाटती जेव्हा गाय

तिच्या मंदी दिसते मले तव्हा माही माय

जेव्हा गाय हंबरून आपल्या वासराला चाटते, तेव्हा आपले वात्सल्य दाखविले त्या गाईच्या वासल्यामध्ये कवीला आपल्या आईचे वात्सल्य दिसते.

कवीच्या घरची परिस्थिती अतिशय वाईट होती, दुष्काळामुळे त्याची परिस्थिती अधिकच बिकट झाली, त्यावेळी आपल्या मुलाला जगविण्यासाठी तिची परिस्थितीशी झुंज देणे चालू होते.

आया बाया सांगतात की मी होतो जव्हा तान्हा

दुकायाच्या साली मायेचा आटला होता पान्हा

पिठामंदी पाणी घालून मले पाजत जाय

तीला रानावनात फरकट्या वेसायला जावे लागे, त्यावेळी तिच्या पायात साधी चप्पल नसेल अनवाणी फिरताना ती काट्याची ही पर्वा करीत नव्हती.

या सर्व कष्ट सोबत कवीच्या वडिलांना दारूचे सुद्धा व्यसन होते. दारू पिऊन मायला ते मारहाण करायचे, वडीला समोर ती थरथर कापत असे, जणू कसायाच्या दावणीला एखादी गाय बांधावी अशी तिची अवस्था झाली होती. सुट्टी मध्ये जेव्हा तो घरी यायचा तेव्हा त्याची माय शेजाऱ्या–पाजाराकडून उसन पासन आणून त्याला पोटभर खायला घालत असे.

कवीचा बाप सतत त्याच्या आईच्या मागे लागून त्याला शिक्षण सोडण्यासाठी नांदा लावत होता. शिकूनशाणी कोणता साहेब होणार असा उपरोधपणे बोलत असे.

पण मायला मात्र आपला मुलगा शिकावा अशी अंतकरणापासून तळमळ होती. त्यासाठी ती आपल्या नवऱ्याला शपथ घालत असे, त्याचे कान भरू नका, त्याला शिक्षणापासून दूर करू नका, असे डोळे भरून सांगत असे इतर सर्व आईनं प्रमाणे आपला मुलगा मोठा व्हावा, सन्मुख पहावे, नात नातवंडाचे तोंड पहावे यातच तिच्या जीवनाचे सर्वस्व आहे.

लेकरासाठी दिवस–रात्र झटणारी आई बघून कवीला वाटते, याच आईच्या पोटी पुन्हा जन्म घ्यावा आणि आईची सेवा करावी आईच्या वासल्याचे वर्णन करणारी स. ग. पाचपोळ यांची अतिशय सुंदर कविता आहे.

वामन निंबाळकर यांची माय ही कविता बालपणी त्यांना सोडून गेलेल्या आईच्या स्मृती जागवणारी आहे. आईची आठवण त्यांना हळवी करताना दिसते, अतिशय संवेदनशील पद्धतीने लिहिली गेली आहे. कवीची माय पांढरपेशा वर्गातील नाही, तर दलित आणि कष्टकरी समाजातील आहे. दलित कवितेतून वेदनेची जाणीव तीव्रतेने यात येताना दिसते. त्याची माय जंगलातील लाकडाची मोडी विकून आपल्या लहान लहान मुलाचे पालन पोषण करते, दारिद्र्यातही मुलांना जगण्यासाठी धडपड करणारी माय यामध्ये दिसते.

जसा दिस उडून जाई काळोखाचे राज्य असे
आम्ही बसू दरवाज्यात झोपडीत साधा दिवा नसे

कवीची आई कष्टकरी हातावर पोट असणारे त्याचे कुटुंब होते. त्याची आई जंगलात जाऊन काट्या गोळा करून त्याची मोळी करून विकत असे, त्यामुळे तिला घरी यायला बऱ्याचदा अंधार होई. जसा दिस बुडून जाई व सर्वत्र काळोख पसरलेला असे, तेव्हा कवी दरवाजाजवळ बसून राही झोपडीत साधा दिवा नसे. आजूबाजूच्या लोकांची परिस्थिती त्यांच्यापेक्षा चांगली होती घरोघरी दिवे लागत, भाकरी तयार केल्या जात, कुठे बेसन कोठे वांगे तयार केले जात, नाकात त्याचा वास जाईल पोटात भुकेचा उसळलेला असे, पण काही उपाय नव्हता अशा असाह्य अवस्थेमुळे डोळ्यात आसवांच्या धारा लागायच्या.

अंधारातून वाट काढत कवीची आई सावकाश घराकडे येईल, तेव्हा तिच्या डोक्यावर मोठा भारा असे, त्यामुळे चालताना बऱ्याचदा तिचा तोल जाई, काळी काळी कुशदेह असलेली अशी त्यांची आई होती. सकाळपासून मोळी साठी

वनवण रानातील फिरत असे, मोळी विकलेल्या गेली तरच त्यांना जेवायला मिळे, ज्या दिवशी मुळी विकल्या जात नसेल तेव्हा त्यांना उपाशी पोटी झोपावे लागे कमालीचे दारिद्र त्यांच्या वाट्याला आले होते.

अशाप्रकारे त्यांची आई एकट्याने संसाराचा गाडा ओढत होती. एक दिवस काय झाले, कसे त्यांना कळले नाही, त्यांची माय पाय बांधून आली, पायातून भळाभळा रक्त वाहत होते, एक काळा साप तिला चावला होता, ती जमिनीवर पडली होती, गडे मंत्र आदी गावठी उपचार तिच्यावर करण्यात आले, अंधश्रद्धेमुळे म्हणा किंवा परिस्थितीमुळे आधुनिक उपचार तिच्यावर होऊ शकले नाही. त्यामुळे दिवस निघताना तिच्या देहातून प्राण निघून गेला. त्यांनी हंबरडा फोडला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आपल्या लहान लहान पोरांना अनाथ करून माय निघून गेली. या सर्वाच्या स्मृती कवीच्या मनात आहे, या घटनेला बराच काळ लुटून गेला असेल गरिबीच्या, अंधश्रद्धेच्या अनुभवामुळे आईच्या कष्टाची तिचा झालेला करूण मृत्यू यामुळे तो आईची प्रतिछुती कुठल्याही कष्टकरी आई मध्ये बघतो, कोणाचाही वाट्याला हे दुःख येऊ नये असे त्याला वाटते, कवीची परिस्थिती कालांतराने चांगली झाली, पण कष्टकरी स्त्री बघितली की गरज नसताना तिची मोळी घेतो व आई गेल्याच्या दुःखातून बाहेर येण्याचा प्रयत्न करतो.

शोधते माझी नजर माय आता मी उदास होतो

दिसता कृष मोळी वाली मोळी तिची विकत घेतो

**संदर्भ –**


**अर्वाचीन मराठी काव्य दर्शन, डॉ अक्षय कुमार काळे पा.ना. बनहट्टी प्रकाशन नागपूर 1999**

**मराठी कविता आणि आधुनिकता, मनोहर यशवंत आंबेडकर धम्म प्रकाशन नागपूर**

**मराठी कविता आकलन आणि आस्वाद, नागनाथ कोत्तापल्ले स्वरूप प्रकाशन**

**साहित्य समीक्षा आणि संवाद, दिलीपराज प्रकाशन प्रा लि पुणे 1999**